# नागपूर जिल्हयातील आश्रमशाळांची प्रगती आणि आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा विकास एक अध्ययन

गुरूदास नेहारे[1] आणि सत्यप्रिय इंदूरवाडे[2]

१) संशोधक, पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, नागपूर
२) सहयोगी प्राध्यापक रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

**प्रस्तावना**

राष्ट्राच्या विकासाकरिता समाजातील सर्व घटकांचा अभ्यास करणे महत्वाचे, गरजेचे आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून ७४ वर्षे पलटून समाजातील सर्व घटकांचा सर्वांगीण विकास झाला नाही.

आदिवासी समाज हा भारतातील पूर्वीपासूनच मागास व अप्रगत आहे. एवढे वर्षे स्वातंत्र्याला पालटुनही समाजाचा विकास न होणे सरकार समोरील आव्हाने आहे. त्याचमुळे सरकारने कल्याणकारी योजनांची आखणी करतांना सुधारित समाजापासून दूर राहिलेल्या आदिवासी समाज मोठया प्रमाणात अप्रगत, मागास तसेच अशिक्षित आढळतो.

आदिवासी समाजाचा आर्थिक, सामाजीक दर्जा खालावलेला आढळतो. आदिवासींच्या विकासाकरिता त्यांच्या शिक्षणाचा दर्जा उंचावण्याकरिता शासनाने उचलले पाऊल म्हणजेच आदिवासी आश्रमशाळा होय.

**आदिवासी क्षेत्रात झालेले शिक्षणाचे प्रयत्न**

स्वातंत्र्यापूर्व काळातही आदिवासींचे शिक्षणातही काही प्रयत्न झालेले दिसतात. खिस्ती मिशनऱ्यांकडून इ.स.१९२० मध्ये काही जिल्हया व शाळा उघडल्यावन अनेक कारणांनी त्या शाळा चालल्या नाही याचे मुख्य कारण म्हणजे दारिद्रय होय.

घरातील मोठया माणसांना मजूरीसाठी व शेतीच्या कामासाठी बाहेर जावे लागते त्यामुळे गुरे, बकऱ्या, मुले सांभाळणे मुलांनाचे करावे लागते मुलांना १३–१४ वर्षाचा

झाला की त्यालाही मजूरी मिळविण्यासाठी कामावर जावे लागते. त्यामुळे मुलांना शाळेत पाठविणे शक्य होत नाही. त्यातच दारिद्रयामुळे शिक्षण घेत नाही आणि शिक्षण नसल्यामुळे दारिद्रय पिच्छा सोडत नाही. अशा एका दृष्टांकात आदिवासी जनता सापडलेली आहे.

आदिवासीच्या विकासाबाबत विचार करण्यासाठी सेमिन्टन समीतीची स्थापना झालेली होती. इ.स.१९३८ साली सेमीग्टनने आपला अहवाल ब्रिटिश राज्यकर्त्यांपुढे सादर केला व त्यात आदिवासींच्या शिक्षणासाठी आश्रमशाळा व आदिवासी प्राथमिक शिक्षण सुरू करण्यात यावे, अश्या शिफारसी केल्या.

**माहिती संकलन पद्धती**

प्रस्तुत अभ्यास पूर्णपणे दुय्यम माहितीवर आधारित आहे. दुय्यम माहितीसाठी विविध शासकीय अहवाल, संशोधकाच्या अहवालाच्या अभ्यास करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे शाळेतून दिलेला रिकॉंडचा पण समावेश आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टये**

१. नागपूर जिल्हयातील आश्रमशाळांचे आदिवासीच्या शैक्षणिक विकासाचा आढावा घेणे.

२. आदिवासी विद्यार्थ्यांच्या लाभाच्या शैक्षणिक प्रगतीचे अध्ययन करणे.

३. आदिवासी समाजाला सरकारकडून मिळणाऱ्या मदतीचे अध्ययन करणे.

**विषयासंबंधी प्रसिद्ध साहित्याचा आढावा (Review of litrature)**

१. श्री नंदकिशोर शिंगाडे हयांच्या मते आदिवसीच्या शैक्षणिक विकास समाधानकारक झालेला नाही. सरकार मार्फत आश्रमशाळेवर होणार खर्च हा अपूरा असतो.

२. श्री गोविंदप्रसाद दूबे यांच्या संशोधनात त्यांनी असे मांडले की आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक उपलब्धता व समस्या, त्यांचे व्यक्तीमत्व निराकरण

सरकारकडून केल्या जात नाही. आदिवासी जमातीतील आश्रम शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी पालकांचा व्यवसाय मुख्यत: मजूरी असतो आणि त्यांची आर्थिक स्थिती हलाखीची असते.

३. विविध वृत्तपत्रात आढळून आलेल्या बाबींवरून असे दिसते की सरकार आदिवासी आश्रमशाळेसाठी मोठया प्रमाणात खर्च करतो आणि आश्रमशाळेकडे पायाभूत सुविधांचा अभाव दिसून येतो.

**आर्थिक विकासात शिक्षणाचे महत्व**

शिक्षण आणि आर्थिक विकास यांचा जवळचा संबंध आहे. शिक्षणाच्या आर्थिक विकासातील योगदान अर्थशास्त्रज्ञांनी मान्य केले. अर्थशास्त्राचे जनक ॲडम स्मिथ यांनी म्हटले आहे की व्यक्तीने शिक्षणाद्वारे गुणवत्तेने व कार्यक्षमतेने घातलेली भर देशाच्या एकूण भांडवलाचा एक भाग आहे.

शिक्षणामुळे राष्ट्रीय उत्पन्नत वाढ होते. प्राथमिक शिक्षण ही शैक्षणिक प्रगतीमध्ये सर्वात पहिली पायरी आहे. सर्वांना प्राथमिक शिक्षण मिळाले पाहिजे. या दृष्टीने सरकारी पातळीवर प्रयत्न होत आहे.

आज भारत देश एकविसाव्या शतकाच्या उंबरठयावर उभा आहे. तरी आदिवासींच्या शैक्षणिक विकास समाधानकारक नाही. देशात संपूर्ण आदिवासी संख्या जवळ जवळ १०.५० कोटी आहे. आणि १०.५० कोटीत एक हजार जमाती आहे. या एक हजार जातीच्या आहे. या एक हजार जातीच्या संख्येमधून फारच थोडया जमाती शिक्षणाकडे वगळता आदिवासी शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे.

**आश्रमशाळेचा जुना व नविन दृष्टीकोन**

व्यक्तीच्या विकासासाठी व्यक्ती म्हणजे व्यक्तीच्या सर्वांगीन विकास म्हणजे क्षेत्रविकास नव्हे. परंतु आदिवासी समाज अज्ञान व दारिद्रयात होता. आदिवासी दऱ्याखोऱ्यात राहत असल्याने त्या भागाचा विकास झालेला नव्हता. त्यामुळे व्यक्तीच्या

विकासासाठी आदिवासी भागात शिक्षणाच्या बरोबर त्या भागाचा विकास हा नविन दृष्टीकोनासमोर होऊन शासनाने धोरणाची आखणी केली होती.

या प्रक्रीयेत मुले, पुरूष व स्त्रिया या सर्वांचा विकास अपेक्षित होता. त्या दृष्टीने आदिवासींचे वास्तव्यास डोंगराळ दुर्गम भाग हया योजनामध्ये अंतर्भुत करण्यात आला. शिक्षणाच्या माध्यमातून एकत्रित क्षेत्रविकास व त्यातून आदिवासी च्या सर्वागीन विकास करण्याचा प्रयत्न शासन करित आहे. आश्रमशाळेतून पुस्तकी ज्ञानाच किंवा साक्षरता वाढविणे व किवळ एकच हेतू त्यांनी धरला जाणार नाही तर शेती, दूग्धपालन छोटे उद्योगधंदा सुरूवात करणे हयालाही प्राधान्य देण्यात आले.

आश्रम शाळा या ग्रामीण भागसाठीच असल्यामुळे आश्रमशाळेचे नियोजन अनुशेष काढतांना ग्रामीण आदिवासी लोकसंख्येचा विचार करण्यात आला आहे. त्यानुसार डोंगराळ वाहतुकीच्या दृष्टीने दुर्गम अशा भागासाठी व आदिवासी जमातीसाठी हा निकर्ष २५००–३५०० आदिवासी लोकसंख्या १ आश्रम असे ठरते.

**आश्रम शाळेची उद्दिष्टये**

१. आदिवासी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास करणे.

२. शैक्षणिक सोयी उपलब्ध करून देणे०

३. अंधश्रद्धा दूर करणे.

४. दऱ्या खोऱ्यातील भागात शिक्षण पोहोचविणे.

५. आदिवासी समाजाची प्रगती उंचाविणे

६. आदिवासी क्षेत्रात शिक्षणाच्या माध्यमातून सर्वांगीण विकास साधने.

७. आदिवासी समाजातील अज्ञान दूर करणे.

**शासकीय व अनुदानित आश्रमशाळांची विद्यार्थ्यांची प्रवेशसंख्या**

प्रस्तुत लेख प्रकाशित करित असतांना लेखामध्ये शासकीय आणि अनुदानीत आश्रमशाळांच्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश २००२–०३ ते २००६–०७ या कालावधीचा घेतला आहे.

शासकीय आश्रमशाळा विद्यार्थी प्रवेश संख्या

| वर्ष | बेलदा | कवडस | हरदोली | लाडगाव | कोलीतमारा | भारेगट | नवेगाव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २००२–०३ | ५९१ | ३४८ | २७६ | १४५ | २५६ | १२४ | २४० | १९८० |
| २००३–०४ | ७०७ | ४६१ | ३६१ | २५६ | ३२२ | २१४ | २५६ | २५७८ |
| २००४–५ | ७०० | ३८६ | ३६१ | २१४ | ३९७ | २५० | २८४ | २५९२ |
| २००५–०६ | ६४६ | ३०५ | ३४९ | २२३ | ४२८ | २६९ | ३४९ | २५६९ |
| २००६–०७ | ६०१ | २७० | ३३० | १७१ | १९७ | २५७ | ३१३ | २३४० |
| एकूण | ३२४५ | १७७० | १६७७ | १०१० | १८०१ | १११४ | १४४२ | १२०५९ |

स्त्रोत – शाळेने दिलेल्या माहितीच्या आधारे.

वरिल तक्त्यात असे दिसून येते की सत्र २००२–०३ या शासकीय आश्रमशाळेत एकुण विद्यार्थी संख्या १९८० होता तर सत्र २००६–०७ पर्यंत ती वाढून २३८० पर्यंत गेली थोडक्यात असे म्हणता येईल ग्रामीण भागातील आदिवासी गरज आणि गरीबी यांच्यामुळे आश्रम शाळेतील विद्यार्थी संख्येत वाढ झाली असे दिसून येते.

**अनुदानित आश्रमशाळांचा प्रवेशीत विद्यार्थ्यांची संख्या**

शासकीय आश्रमशाळेतील प्रवेशीत विद्यार्थ्यांचा अभ्यास केल्यानंतर आश्रम शाळेतील प्रवेशीत विद्यार्थ्यांचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. अनुदानीत आश्रमशाळेतील सत्र २००२–०३ ते २००६–०७ या सत्रातील प्रवेशीत संख्या दिसणार आहे.

### अनुदानीत आश्रम शाळेची विद्यार्थ्यांची प्रवेश संख्या

| वर्ष | देवलापार | टेकाडी | निमखेडी | सावळी | मंगरूळ | भानसोली | उखळी | दिगना | बंदा | उदासा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २००२–०३ | २४८ | २१९ | २५५ | २०६ | २०७ | १३७ | २९८ | २९२ | २८४ | १५२ | २२९८ |
| २००३–०४ | २९२ | ३०४ | २८८ | २५९ | २५३ | १३२ | २८५ | २८७ | २८५ | २९३ | २५७८ |
| २००४–०५ | २९४ | २९८ | २८५ | ३२० | ३०९ | १४० | २९८ | २९२ | ३०६ | ३०० | २८४२ |
| २००५–०६ | २९२ | २२८ | २७३ | ३११ | २०७ | १३४ | ३०९ | २८२ | ३१६ | ३१५ | २८३३ |
| २००६–०७ | ३३७ | ३३९ | २०४ | २६२ | ३२७ | १३४ | ३२९ | २८० | २९९ | ३१० | २९८४ |
| एकूण | १४६४ | १४५८ | १३७९ | १५७५ | १४०३ | ६७७ | १५११ | १४३० | १४८२ | १३७० | १३६३५ |

स्त्रोत – शाळेने दिलेल्या माहितीच्या आधारे.

वरिल तक्त्यावरून असे निर्देशनास येते की, शासकीय आश्रम शाळाच्या तुलनेत अनुदानीत उशीरा स्थापन झाल्या. त्याता वरिल आकडेवारीवरून असे दिसते की, २००२–०३ पासून २००६–०७ या सत्रात दरवर्षाला पण अनुदानीत आश्रमशाळेत सुद्धा प्रवेशीत विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे.

### शासकीय व अनुदानीत आश्रमशाळांच्या प्रगतीचे अध्ययन

दोन्ही आश्रमशाळांच्या अभ्यास करतांना शाळेतील प्रवेश संख्या आणि १० वी च्या अभ्यास केला गेला आहे. दोन्ही शाळेतील निकालातील फरक लक्षात घेतला गेला आहे. दोन्ही आश्रमशाळेतील दहावीच्या सत्र २००२–०३ ते २००६–०७ निकाल लक्षात घेतला आहे. प्रस्तुत लेखात अनुदानीत आश्रमशाळा स्थापना उशीरा झाल्याने दोन्ही शाळांचा निकालामध्ये फक्त २०१२, २०१३ आणि सन २०१४ लक्षात घेतले गेले आहे.

## शासकीय व अनुदानीत आश्रमशाळांचा इयत्ता १0वी चा निकाल/प्रगती/तुल्ना

| आश्रमशाळा | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | निकालातील अंतर |
|---|---|---|---|---|
| भोंगड | ७७.४२ | ६६.६७ | १००.०० | २२.५८ |
| कवडस | ५०.०० | ८२.७६ | ९०.७४ | ४०.७४ |
| कोलितमारा | ७८.७२ | ७६.६७ | ८९.७४ | ११.०२ |
| नवेगाव | ७४.३६ | | ७८.५७ | ४.२१ |
| हरदोली | ७१.४३ | ८४.८५ | ९१.६६ | २०.२३ |
| बेलदा | ८९.०९ | ८७.७६ | ८८.४६ | -०.६३ |
| लाडगाव | ७५.०० | ७०.५९ | ८७.५० | १२.५० |
| शासकीय आश्रमशाळांतील एकुण सरासरी निकाल | ७३.७२ | ६७.०४ | ८९.५२ | १५.८० |
| दाहोदा | ८२.२२ | ७७.३६ | ८३.३० | १.०९ |
| बांद्रा | ७८.२६ | ६९.७७ | १००.०० | २१.७४ |
| टांगला | ६८.४२ | ७६.१९ | ९५.५५ | २७.१३ |
| देवलापार | ८२.६१ | ८७.१८ | ८८.६३ | ६.०२ |
| निमखेडा | ८७.६२ | ८७.०४ | ८८.६९ | १.२७ |
| टेकाडी | ४७.७३ | ७६.३४ | ७२.५४ | २४.८१ |
| खापरी | ६४.७१ | ३३.३३ | ४८.८८ | -१५.८३ |
| चिमनाझरी | ६९.१३ | ४८.३९ | ५४.१६ | -१४.९७ |
| नगरधन | ४४.१९ | ७२.३४ | ८२.७९ | ३८.६० |
| सावली | ७१.४३ | ७८.५७ | ७८.५७ | ७.१४ |
| तास | ८४.२१ | ८४.२१ | ९२.८५ | ८.६४ |
| उदासा | ९४.९४ | ८२.६१ | ९३.३३ | -१.६१ |
| बोथली | ३४.०० | ८६.११ | १५.३८ | -१८.६२ |
| मांढळ | ४९.६९ | ५०.०० | ७५.४५ | २५.७६ |
| उखळी | ६७.४४ | ८२.७६ | ८४.२१ | १६.७७ |
| पिठोरी | ७६.९२ | ७३.१७ | ८३.७८ | ६.८६ |
| अनुदानित आश्रमशाळातील एकुण सरासरी निकाल | ६८.९७ | ७२.८४ | ७७.३९ | ८.२४२ |

वरिल तक्त्यावरून शासकीय व अनुदानीत आश्रमशाळांचा सन २०११–१२, २०१२–२०१३, २०१३–२०१४ चा निकाल दोन्ही शाळातील निकालातील फरक दर्शविला आहे. निकालाचा अहवाल केल्या शासकीय आश्रमशाळेची सरासरी अनुक्रमे

७३.७९%, ६०.०४% – २०१३–१४ मध्ये नो. ८९.५२% वाढला असे निर्दशनास दिसुन येतो.

शासकीय व अनुदानीत आश्रमशाळांची निकालातील तुलना किंवा फरक बघितल्या असे निदर्शनास येते की शासकीय आश्रमशाळांचा ३ वर्षाच्या निकालात १५.५ % वाढ झाली असे निर्दशनास येते. अनुदानीत आश्रमशाळाचा निकालाच्या फरकात ३ वर्षात अनुदानीत आश्रमशाळांचा ८.४२% अनुदानीत आश्रमशाळांच्या निकालातुन वाढ झाली असे दिसते. दोन्ही आश्रमशाळांचा सरासरी ७% निकालाचे प्रमाण जास्त दिसुन येते. यावरून असे म्हणता येईल की अनुदानीत आश्रमशाळांच्या तुलनेत शासकीय आश्रमशाळांची जास्त प्रगती झाली असे म्हणता येईल.

**निष्कर्ष**

१. आश्रम शाळेला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये प्रामुख्याने गरिब विद्यार्थ्यांचे प्रमाण आढळले.

२. आश्रमशाळे उच्च शिक्षणाच्या आभाव दिसुन येतो.

३. आश्रमशाळेत शिक्षण घेणाऱ्या पालकांचे आर्थिक उत्पन्न तोकडे आढळले.

४. शासनाने आदिवासी कल्याणासाठी राबविणाऱ्या योजनांची पुरेशी माहिती नसते.

५. आदिवासी व ग्रामीण क्षेत्रात शिक्षणाचा विकास न झाल्याने नोकरी करणाऱ्याचे प्रमाण कमी असते.

६. आश्रमशाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पाल्यांना मुलांच्या शिक्षणाबाबत उदासीनता दिसून येते.

**ग्रंथसूची**


- गारे गोविंद १९८६ आदिवासींचे समस्या आदिवासी संशोधन व प्रकाशन संस्था
- मुनघाटे डॉ. प्रमोद, 'आदिवासी मराठी साहित्य – स्वरूप आणि समीक्षा प्रतिमा प्रकाशन २०१७
- सांगवे विलास आदिवासीचे सामाजिक जीवन पॉपुलर प्रकाशन १९७२
- ग्रामीण विकास २००९, २०१०, २०१९, भारत सरकार प्रकाशन.
- दुबे गोविंदप्रसाद, 'आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक उपलब्धी, महत्वाकांक्षा, समस्या, त्यांचे व्यक्तिमत्व व देण्यात येणाऱ्या सोयींचा अभ्यास' – पीएच.डी. करिता सादर केलेला शोधप्रबंध
- दिवे शुभांगी – 'आदिवासी विकास महामंडळाचा आर्थिक अभ्यास'
- शेलकर ॲड. अभया, 'आश्रमशाळा संहिता', नाशिक लॉ हाऊस, २००७
- कोठेकर डॉ. शांता, अंधारे भा.रा.., 'नागपूर नगरी त्रिशताब्दी इतिहास ग्रंथ', १७०२ ते २००२, महाराष्ट्र शासन, शासकीय मुद्रणालय, नागपूर, २००२